# पारिजात

## को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

नोंदणी क्र. : टी.एन.ए. (टी.एन.ए.) / आर.एस.आर./ सी.आर./९५१/९७




१२ वा

वार्षिक अहवाल

सन

२००८-०९

प्रशासकीय कार्यालय

पारिजात भवन, प्लॉट नं. १८, सेक्टर १० ए, नेरुळ, नवी मुंबई ४०० ७०६.

# विद्यमान संचालक मंडळ



श्री. कैलास वि. खोपडे
अध्यक्ष



श्री.दशरथ आ. बडदे
उपाध्यक्ष



श्री. बाळासाहेब वि. ताकवले
सचिव



श्री. कृष्णा पां. धुमाळ
खजिनदार



श्री. दिपक शं. टेळे
संचालक



श्री. श्रीपती शं. गरुड
संचालक



श्री. अमृत दा. पाटील
संचालक



श्री. आनंदा बा. आंबवले
संचालक



सौ. मंदा ज्ञा.खोपडे
संचालिका



श्री. शंकर रा. पुली
संचालक



श्री. अनंत ना. प्रभाळे
संचालक



श्री. सचिन य. रणनवरे
कर्मचारी प्रतिनिधी



श्री. विजय बं. मोरे
मुख्य कार्य. अधिकारी

# पारिजात को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई

रजि. नं. टी.एन.ए.(टी.एन.ए.)/आर.एस.आर./(सी.आर.) ९५१/९७

प्रशासकीय कार्यालय : पारिजात भवन, फ्लॉट नं. १८, सेक्टर १० ए, नेरुळ, नवी मुंबई-४०० ७०६.

## बाराव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यांत येते की, पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई या संस्थेची **बारावी सर्वसाधारण सभा रविवार दि. ०९/८/२००९ रोजी सकाळी १०.०० वाजता गुरव ज्ञाती भवन, २-सी/३, सेक्टर ९-ए, बस डेपोजवळ, वाशी, नवी मुंबई,** या ठिकाणी संस्थेचे अध्यक्ष श्री. कैलास विठ्ठल खोपडे यांच्या अध्यक्षतेखाली खालील नमूद केलेल्या विषयांचा विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सन्माननीय सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून कामकाजात भाग घ्यावा ही विनंती.

## सभेपुढील विषय

१) दि. ०९ /०८ /२००८ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) दि. ३१ मार्च २००९ अखेरचा कार्यकारी मंडळाने सादर केलेले ताळेबंद पत्रक व नफा तोटा पत्रकास मंजुरी देणे.

३) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २००८-२००९ च्या नफा विभागणीस मंजुरी देणे.

४) सन २००७-२००८ च्या वैधानीक लेखापरिक्षण अहवालास मंजुरी देणे.

५) सन २००८-२००९ च्या अंतर्गत लेखापरिक्षण अहवालास मंजुरी देणे.

६) सन २००९-२०१० सालाकरिता अंतर्गत हिशेब तपासणीसाची नेमणूक करुन मानधन ठरविणे.

७) सन २००९-२०१० च्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे.

८) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

संचालक मंडळाच्या वतीने

ठिकाण : नवी मुंबई.

दिनांक : २०/७/२००९

बाळासाहेब विश्वास ताकवले
(सचिव)

## विशेष सूचना

१) गणसंख्ये अभावी सभा तहकूब झाल्यास, ठरलेल्या वेळेनंतर अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी ही सभा घेण्यात येईल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

२) ज्या सभासदांना प्रश्न विचारावयाचे असतील अगर सुचना करावयाच्या असतील त्यांनी नियोजीत सभेच्या तारखेपूर्वी सात दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयात लेखी कळविणे आवश्यक आहे.

३) सभेस येताना अहवालाची प्रत बरोबर आणावी.



# .....जय हो !

सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,

आपल्या संस्थेच्या १२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने आपणा सर्वांचे मन:पुर्वक स्वागत ! हा अहवाल आपल्या हाती देताना मला विशेष आनंद होत आहे आणि मुखपृष्ठावर दिसत असलेली संस्थेची इमारत पाहून आपणास सुध्दा तितकाच आनंद झाला असेल याची खात्री आहे.संस्थेचे ३१ मार्च २००९ चे वित्तीय निकाल पाहता संस्थेने एकूण व्यवसायाचा रु. ४७.०० कोटींचा टप्पा पूर्ण केला आहे.

आर्थिक, राजकीय, सामाजीक क्षेत्राचा विचार करता केवळ आपल्या देशालाच नव्हे तर संपूर्ण जगाला सन २००८-०९ हे वर्ष कटू स्मृती देऊन गेले, यावर्षात अमेरीका व युरोपमधील अनेक मोठ्या उद्योगांना मंदीचा मोठा तडाखा सहन करावा लागला. भारतात त्याची तिव्रता फार मोठ्याप्रमाणात जाणविली नाही परंतु मुंबईवरील दहशतवादी हल्याने सारा भारत देश सुन्न झाला.अनेक निरपराधांचे बळी गेले. देशाचा आर्थिक कणा असलेली मुंबई उध्दवस्त करण्याचे दहशतवाद्यांचे मनसुबे आपल्या निधडया छातीच्या जाँबाज पोलीस कर्मचारी-आधिकारी यांच्यामुळे उधळले गेले. त्यांच्या शौर्याला मी सलाम करतो.

सभासद बधूंनो, काळ बदलत चालला, नवनविन संकल्पना, नविन शोध लागू लागले आहेत. काल जे नविन वाटत होते ते आज जुने वाटू लागते इतक्या झपाटयाने बदल घडू लागले आहे. रस्ते, ब्रीज,दळणवळणाची साधने, मोबाईल, इंटरनेट याद्वारे सारे जग जवळ येऊ लागले आहे. परंतू माणूस मात्र माणसापासून दूरावत चालला आहे. प्रगती करताना, स्पर्धा करताना माणसातील माणूसकी लोप पावल्याची पदोपदी जाणीव होते. एकमेकांना सहाय्य करत सुपंथाकडे जाण्याची प्रवृत्ती नष्ट होऊ पाहत आहे.

हे सर्व आपणांस बदलावे लागणार एक परिवार, एक समाज, एक राज्य, एक राष्ट्र हा विचार दृढ करण्यासाठी आपण कटीबध्द होऊ 'पारिजात' परिवारा तर्फे आपल्या समाज बांधवांचा आर्थिक, सामाजीक स्तर उंचावण्याचा प्रयत्न आजपर्यंत आम्ही केला यापुढेही करत राहू, नाहीतर आपल्या येथे 'स्लम' व त्यांच्याकडे 'मिलेनियर' असे विसंगत चित्र दिसेल. ही आर्थिक विसंगती जेव्हा आपण बदलू शकू तेव्हाच खऱ्या अर्थाने आपण सारे म्हणू ........ जय हो !

**धन्यवाद !**

**जय हिंद !** **जय महाराष्ट्र !!** **जय सहकार !!!**

आपला सहकारी
कैलास खोपडे
(अध्यक्ष)

# १२वा वार्षिक कार्य अहवाल सन २००८ - २००९

सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,

संस्थेच्या संचालक मंडळाच्या वतीने दिनांक ३१ मार्च २००९ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा १२ वा वार्षिक अहवाल, ताळेबंद पत्रक व नफा -तोटा पत्रक आपणासमोर सादर करताना आम्हास कर्तव्यपूर्तीचा विशेष आनंद होत आहे. दरवर्षीप्रमाणे या वर्षीसुद्धा संस्थेने आपल्या प्रगतीची वाटचाल ठरवून दिलेल्या उद्दिष्टानुसार चालू ठेवलेली आहे.

अहवाल वर्षात संस्थेने केलेल्या प्रगतीची व कामकाजाची कल्पना पुढील आकडेवारीवरुन येईल.

## संस्थेची वित्तीय स्थिती :-

(रु.लाखात)

| तपशिल | ३१/३/२००८ रु. | ३१/३/२००९ रु. | वाढ रु. | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | १०६.८५ | १२१.१२ | १४.२७ | १३.३६ |
| राखीव व इ.निधी | ११०.७९ | १२४.३१ | १३.५२ | १२.२० |
| सभासद ठेवी | १८६०.३५ | २४०८.१६ | ५४७.८१ | २९.४५ |
| गुंतवणूक | ३७७.०२ | ५२०.७२ | १४३.७० | ३८.११ |
| सभासद कर्ज | १५१२.६२ | १८२३.७६ | ३११.१४ | २०.५७ |
| खेळते भांडवल | २११७.५३ | २६९४.७५ | ५७७.२२ | २७.२६ |

पारिजात संस्थेने सहकारी तत्वाचा पुर्ण सन्मान राखून आपल्या आर्थिक व सामाजिक सेवेने आम जनतेमध्ये विश्वासाची, सहकाराची, विकासाची भावना निर्माण केली आहे. सभासद ठेवीदार व हितचिंतक यांच्या सहाय्याने व निस्वार्थीपणे केलेल्या अव्याहत परिश्रमामुळे संस्थेने आपल्या प्रगतीची उद्दिष्टे व आर्थिक धोरणे जोपासली असून केलेली प्रगती नेत्रदिपक आहे. याबद्दल आपले दुमत होणार नाही याची आम्हाला खात्री आहे.

## संस्थेच्या प्रगतीचा विस्तृत आढावा

### सभासद : ५१६७

गतवर्षी संस्थेचे ४९०१ सभासद होते, अहवाल वर्षात ४३१ नवीन सभासद झाले आणि १६५ सभासदांनी राजीनामा दिल्यामुळे अहवाल वर्षाअखेर ५१६७ सभासद संख्या झाली आहे.

### भाग भांडवल : रु. १२१.१२ लाख

संस्थेचे अधिकृत भागभांडवल रुपये पाच कोटी असुन गतवर्षाअखेर संस्थेचे वसुल भागभांडवल रु.१,०६,८५,०००/- इतके होते. त्यामध्ये अहवाल वर्षात रु. १४,२७,४००/- ने वाढ होऊन दि. ३१ मार्च २००९ अखेर संस्थेचे वसुल भागभांडवल रु. १,२१,१२,४००/- इतके आहे.

## गंगाजळी व इतर निधी : रु. १२४.३१ लाख

संस्थेची जनमानसात असलेली विश्वासार्हता ही संस्थेच्या स्वनिधीवर अवलंबून असते. निधी जेवढा जास्त तितका संस्थेचा पायाही मजबूत असतो, यानुसार संस्थेने राखीव निधी, इमारत निधी, संशयित व बुडीत कर्ज निधी, थकित व्याज निधी, लाभांश समीकरण निधी, सभासद कल्याण निधी, धर्मादाय निधी, सेवक कल्याण व प्रशिक्षण निधी, आकस्मिक निधी उभारलेले आहेत.

गतवर्षाचे संस्थेचे एकूण स्वनिधी रु. १,१०,७८,८०२/- होते त्या मध्ये अहवाल साली रु. १३,५१,७८५/- ने वाढ होऊन वर्षा अखेरीस एकूण स्वनिधी रुपये १,२४,३०,५८७/- इतका झाला आहे.

## ठेवी : रु. २४०८.१६ लाख

संस्थेच्या ठेवी संकलनामध्ये अहवाल वर्षात २९% पेक्षा अधिक अशी नेत्रदीपक वाढ झाली आहे. संस्था देत असलेली ग्राहक सेवा तसेच आपणा सर्वांचा दृढ विश्वास यामुळेच हे साध्य होऊ शकले.

गतवर्षाअखेर ठेवी रु.१८,६०,३४,९६३/- होत्या. त्यामध्ये रु. ५,४७,८१,२००/- ने वाढ होऊन दि.३१ मार्च २००९ अखेर संस्थेच्या एकूण ठेवी रु.२४,०८,१६,१६३/- झाल्या असून ठेवी वाढीचे प्रमाण २९.४५% इतके आहे.

संस्थेने ठेवीदारांकरिता विविध आकर्षक ठेव योजना बनविल्या असून प्रत्येक सभासदांनी ठेव योजनेत पैसे गुंतवून लाभ घ्यावा. संस्थेच्या विविध योजनांमध्ये अहवाल वर्षाअखेर खालीलप्रमाणे ठेवी जमा झालेल्या आहेत व त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| ठेवीचा प्रकार | सन २००५-०६ | संन २००६-०७ | सन २००७-०८ | सन २००८-०९ |
|---|---|---|---|---|
| बचत ठेव | १,०५,७२,२०७ | १,४९,३४,३७४ | १,९५,३०,०७४ | १,८३,२८,६४० |
| दैनंदिन बचत ठेव | २,०९,६८,३०८ | २,९३,१५,८३५ | ४,३०,६९,७६५ | ५,५९,३०,४७२ |
| अल्प मुदत ठेव | ९१,९१,४०८ | १,९४,६७,८०० | १,७६,४८,३६३ | २,३८,५१,२९३ |
| मुदत ठेव | १,३२,१२,६६० | १,९२,७५,१४६ | २,३०,६५,८७१ | ३,३०,६४,५१० |
| दामदुप्पट ठेव | १,८२,८१,४२९ | १,८५,५१,५६७ | १,६५,४३,८९६ | १,९९,४८,३९८ |
| पारिजात बक्षीस ९८ | १,५०,६७६ | ७५,५३५ | ५७,५१५ | ३९,३२८ |
| पारिजात बक्षीस ०० | ३६,७७,३६४ | ३,१६,००३ | २,१२,००३ | १,७८,००३ |
| संकल्प सिद्धी ठेव | ३१,५७,९९६ | ३०,२८,३३४ | २८,२३,४१० | ३०,१९,४६४ |
| सिद्धी ठेव | २९,६०,०६१ | ३१,१४,६८२ | १,१६,००० | ७६,००० |
| मासिक प्राप्ती ठेव | ९९,०२,७२५ | १,५६,६४,२७५ | १,५९,२०,९५० | १,९०,१८,०७५ |
| आवर्त ठेव | १८,८५,२३४ | २२,२८,३९५ | १३,६६,८१८ | १६,७३,६९९ |
| सभासद ठेव | ४१,९०,१०८ | ३२,८२,७२३ | २९,५०,५७२ | २८,७३,६९८ |
| शुभकार्य ठेव | १,२०,८८,९९३ | २,१५,३४,८१० | २,७२,७३,८१६ | ३,१०,३५,४५७ |
| धनवृद्धी ठेव | - | - | १,५४,५५,९१० | १,४३,८३,९६८ |
| धनलक्ष्मी ठेव | - | - | - | १,७३,९५,२३८ |
| एकूण रु. | ११,०२,३८,३६९ | १५,०७,८९,४७९ | १८,६०,३४,९६३ | २४,०८,१६,१६३ |

## गुंतवणूक : रु. ५२०.७२ लाख

महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्याने निधीच्या गुंतवणूकीबाबत घालून दिलेल्या सर्व नियमांचे योग्य प्रकारे पालन संस्थेने केलेले आहे. गतवर्षी संस्थेची गुंतवणूक रु. ३,७७,०२,०२८/- एवढी होती. अहवाल वर्षात त्यात रु. १,४३,६९,५५२/- ने वाढ होऊन एकूण गुंतवणूक रु. ५,२०,७१,५८० /- एवढी आहे. या वाढीचे शेकडा प्रमाण ३८.११% एवढे आहे.

(रु.लाखात)

| गुंतवणूक तपशील | रक्कम |
|---|---|
| दि. ठाणे जिल्हा. मध्य. सह. बँक लि. भाग | १,०००.०० |
| महा. राज्य. सह. पत. फेड.लि. भाग | ३,०००.०० |
| राखीव निधी (रिझर्व फंड) | ३८,९०,२१०.०० |
| संशयित व बुडित कर्ज निधी | १३,६०,०००.०० |
| लाभांश समानिकरण निधी | २,००,०००.०० |
| सभासद कल्याण निधी | ५६,०००.०० |
| सेवक ग्रज्युईटी व कल्याण निधी | १,४९,०००.०० |
| धर्मादाय निधी | ५९,०००.०० |
| मुदत ठेव गुंतवणूक | ४,६३,५३,३७०.०० |
| एकूण रु. | ५,२०,७१,५८०.०० |

## कर्जे : रु. १८२३.७६ लाख

सहकार खात्याच्या मार्गदर्शक सूचनांनुसार छोट्या व मोठ्या व्यावसायिक, व्यापारी व नोकरदार सभासदांच्या आर्थिक उन्नतीसाठी व त्यांच्या जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी आपली संस्था सदैव कटिबद्ध आहे. म्हणूनच कर्ज वाटपाच्यावेळी सर्वसामान्य सभासदांना आम्ही नेहमी अग्रक्रम दिलेला आहे व त्यांना प्राधान्याने कर्ज पुरवठा करुन सभासदांचे राहणीमान उंचविण्याचा प्रयत्न केलेला आहे. कर्जदारांनी कर्जाची नियमित परतफेड करावी अशी संस्थेची अपेक्षा असते.

गतवर्षाअखेर संस्थेचे रु.१५,१२,६२,१२९/-कर्ज येणे बाकी होते अहवाल सालामध्ये संस्थेने सभासदांना रु.१५,३५,६७,६८२/-नव्याने कर्ज वाटप केले असून रु.१२,२४,५३,३९१/- कर्ज वसुल झालेले आहे. अहवाल वर्षाअखेरीस एकूण रु. १८,२३,७६,४२०/- कर्ज येणे बाकी आहे.

## कर्ज थकबाकी : प्रमाण ३.०८%

मा. सहकार आयुक्तांनी ''अनुत्पादीत कर्जाचे''(N.P.A.) निकष पतसंस्थासाठी लागू केले आहेत. परिणामी संस्थेने आपली स्वतंत्र कर्ज वसुली यंत्रणा अधिक कार्यक्षम केली आहे. अनुत्पादीत कर्जे मर्यादित ठेवण्यासाठी आपल्या संस्थेने आटोकट प्रयत्न केले आहेत.

मार्च २००९ अखेर येणे कर्जाशी थकीत कर्जाचे शेकडा प्रमाण ३.०८% आहे. गतवर्षीच्या तुलनेत कर्ज थकबाकीचे शेकडा प्रमाण १.११% ने कमी झाले आहे.

## अनुत्पादक मालमत्ता (N.P.A.) व तरतूदी

बँकींग व्यवसायात कर्जास मालमत्ता असेही संबोधले जाते. या मालमत्तेपासून (कर्जापासून) संस्थेस उत्पन्न न मिळाल्यास अशा मालमत्तेस 'अनुत्पादक मालमत्ता ' (Non Performing Asset) असे म्हणतात व त्याची वेगळी वर्गवारी करावी लागते. ज्याप्रमाणे रिझर्व्ह बॅंकेने सर्व बँकाना एन.पी.ए. ची वर्गवारी करण्याचे बंधन घातले. त्याचप्रमाणे मा. सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र यांचे आदेशानुसार दि. ३१ मार्च २००६ पासून पतसंस्थाना सुद्धा एन.पी.ए.निकष लागू केले व अनुत्पादक कर्जाची कालावधीनुसार तरतूद संस्थेच्या नफ्यातून करण्याचे बंधन घातले आहे.

आपल्या संस्थेचे दि. ३१ मार्च २००९ अखेर निव्वळ एन.पी.ए. चे प्रमाण ३.८५ % आहे. मा. सहकार आयुक्तांच्या परिपत्रकानुसार निव्वळ एनपीचे प्रमाण हे १५ % पेक्षा कमी असणे आवश्यक आहे. सदर अनुत्पादीत कर्जाची संस्थेने १००% पेक्षा अधिक तरतूद केलेली आहे. दि. ३१ मार्च २००९ अखेर अनुत्पादीत कर्जाची तरतूद खालील प्रमाणे आहे.

(रु.लाखात)

| अ.क्र. | कर्जाचे वर्गीकरण | येणे कर्ज रक्कम | आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|
| १. | **उत्पादित जिंदगी** | १७४०.१६ | गरज नाही |
| २. | **अनुत्पादित जिंदगी** | | |
| | अ) सर्वसाधारण जिंदगी | ६१.३५ | ३.०७ |
| | ब) संशयीत जिदंगी | २२.२५ | १०.७६ |
| | क) बुडीत जिंदगी | - | -- |
| | एकूण | १८२३.७६ | १३.८३ |

एन.पी.ए. साठी आवश्यक तरतूद रु. १३.८३ लाख असताना संस्थेने स्वेच्छेने प्रत्यक्ष तरतूद रु. १३.९० लाख इतकी केली असून संस्थेची स्थिती अधिकाधिक भक्कम केली आहे हे आपणास कळविण्यास आनंद वाटतो.

## खेळते भांडवल : रु. २६९४.७५ लाख

गतवर्षाअखेर संस्थेचे खेळते भांडवल रु. २११७.५३ लाख एवढे होते. अहवाल वर्षी संस्थेने सर्व क्षेत्रात भरीव कामगिरी केल्यामुळे खेळते भांडवल २७.२६ % प्रमाणे रु. ५७७.२२ लाखाने वाढून रु. २६९४.७५ लाख इतके झाले आहे.

## संचालक मंडळ सभा :

संस्थेचा कारभार गतीमान होण्यासाठी अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या एकूण १४ सभा झालेल्या आहेत तसेच कर्ज मंजुरी समितीच्या एकूण १३ सभा झालेल्या आहेत. त्याचबरोबर कामकाज नियंत्रण, कर्जवसुली यासाठी सुद्धा सभा आवश्यकते नुसार वेळोवेळी घेतल्या गेल्या.

## कर्मचारी व संचालक प्रशिक्षण :

अहवाल वर्षात संस्थेने आपल्या कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र राज्य सहकारी संघ यांचे अंतर्गत ठाणे जिल्हा सहकारी बोर्ड लि.,तसेच पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., बृहन्मुंबई नागरी सह. पत. फेडरेशन मर्या.,व सहकार भारती प्रशिक्षण केंद्र,कराड यांच्या मार्फत चालविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी अधिकारी वर्गातील सात व लिपीक वर्गातील सात कर्मचाऱ्यांना टप्या टप्याने पाठविले. महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्यातर्फे घेण्यात आलेल्या जी.डी. सी. अॅन्ड ए परिक्षेमध्ये संस्थेच्या नऊ कर्मचाऱ्यांनी पदवी प्राप्त केली आहे.

## नफा विभागणी : रु. १२.३३ लाख

अहवालसाली एकूण खर्च व नियमानुसार कराव्या लागणाऱ्या तरतुदी वजा जाता रु. १२,३२,२२६.६८ नफा झालेला असून गतवर्षीचा शिल्लक नफा रु. ९४७.९२ मिळून नफा रु. १२,३३,१७४.६० आहे. सदर नफ्याची विभागणी पुढीलप्रमाणे करण्याची शिफारास संचालक मंडळ करीत आहे. त्यास आपण मंजुरी द्यावी. ही नम्र विनंती.

(रु.लाखात)

| तपशील | | रक्कम रुपये |
|---|---|---|
| राखीव निधी (२५% प्रमाणे) | रु. | ३,०८,५१६.०० |
| लाभांश (५% प्रमाणे) | रु. | ५,३४,२५५.०० |
| बुडित कर्ज निधी | रु. | २,००,०००.०० |
| गुंतवणूक चढउतार निधी | रु. | १,१०,०००.०० |
| थकीत व्याज तरतूद | रु. | ५०,०००.०० |
| सभासद कल्याण निधी | रु. | १०,०००.०० |
| सहकार प्रशिक्षण निधी | रु. | २०,०००.०० |
| पुढील वर्षासाठी शिल्लक नफा वर्ग | रु. | ४०३.६० |
| एकूण | रु | १२,३३,१७४.६० |

## लेखापरिक्षण :

संस्थेचे सन २००८-०९ या आर्थिक वर्षाची अंतर्गत हिशोब तपासणी श्री. बी. आर. सावंत अँड कं., चार्टर्ड अकौटंट यांनी केलेली असून त्यांनी संस्थेच्या कामकाजाबाबत मोलाचे मार्गदर्शन केले.

## उल्लेखनीय बाबी :

संस्थेने अहवाल वर्षात जे उल्लेखनीय उपक्रम राबविले त्याचा तसेच अन्य बाबींचा थोडक्यात परामर्श खालीलप्रमाणे :-

### १) प्रशासकीय कार्यालय भव्य उद्घाटन सोहळा :

संस्थेच्या आजवरच्या इतिहासातील सर्वात महत्वपूर्ण व गौरवास्पद घटना म्हणजे आपण सर्वांनी गेली काही वर्षे उराशी बाळगलेले स्वप्न पूर्ण झाले. संस्थेचे स्वमालकीचे प्रशस्त व सुसज्ज मुख्य कार्यालयाचे उद्घाटन, विजयादशमीच्या शुभमुहुर्तावर दि.०९ ऑक्टोबर २००८रोजी भारताचे माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री व विद्यमान खासदार मा. आनंदरावजी अडसूळ यांचे शुभहस्ते संपन्न झाले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ नगरसेवक श्री. रमेश शिंदे,नगरसेवक श्री. विजय माने, श्री. अशोकशेठ गावडे (संचालक-मुं.कृ.उ.बा.स.) यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या प्रसंगी नगरसेवक श्री. शिवराम पाटील, श्री. कोंडिबा तिकोने, श्री. रामदास पवळे तसेच बँकिंग क्षेत्र, सहकार क्षेत्र, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवर, त्याचप्रमाणे आमच्यावर प्रेम करणारे नवी मुंबई, मुंबई, पुणे जिल्ह्यातील आमचे असंख्य सभासद, हितचिंतक व अन्य मान्यवर आवर्जून उपस्थित होते.

### २) मोफत रक्त तपासणी शिबीर

संस्थेच्या न्यु पनवेल व चंदननगर या शाखांच्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून संस्थेच्या सभासदांसाठी मोफत मधुमेह व रक्तगट तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.त्यास असंख्य सभासदांनी उपस्थित राहुन चांगला प्रतिसाद दिला व संस्थेने राबविलेल्या उपक्रमाबद्दल प्रशंसोद्‌गार काढले.

### ३) महिला दिन व जेष्ठ नागरीक दिन :

दि. ८ मार्च २००९ रोजी 'जागतीक महिला' दिनाचे औचित्य साधुन संस्थेच्या सर्व शाखांमध्ये महिला दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी संस्थेच्या महिला कर्मचारी, महिला ठेव प्रतिनिधी तसेच महिला खातेदारांना पुष्पगुच्छ देऊन त्यांना सन्मानीत करण्यात आले. त्याच प्रमाणे दि. १ ऑक्टोबर २००८ रोजी 'जेष्ठ नागरिक दिन' विभागीय स्तरावर साजरा करण्यात येऊन संस्थेच्या जेष्ठ खातेदार, सभासद यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

### ४) शिक्षक दिन :

संस्थेच्या चंदननगर शाखेने दि. ५ सप्टेंबर रोजी आयोजीत केलेल्या समारंभात संस्थेचे सभासद असलेल्या शिक्षक / शिक्षिका यांचा मा. अध्यक्ष श्री. कैलास विठ्ठल खोपडे यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी श्री. कोहकडे संपतराव भाऊसाहेब, श्री. संकपाळ प्रतापराव गंगाराम, सौ. संकपाळ कमल प्रतापराव, सौ. कोहकडे तारा संपतराव या आदरनिय शिक्षकांचा यथोचीत गौरव करण्यात आला.

### ५) नियुक्ती बहुमान :

संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. कैलास विठ्ठल खोपडे यांची ''सहकार भारती, सहकार प्रशिक्षण, सहकारी संस्था, कराड'' या राज्य पातळीवरील संस्थेच्या नवी मुंबई जिल्हा समितीवर 'सचिव' म्हणून नियुक्ती झाली. संस्थेच्या सर्व सभासदांचा हा बहुमान असून या माध्यमातून पतसंस्था चळवळीचा आधिकाधिक विकास होण्यास हातभार लाभेल.

### ६) वेस्टर्न युनियन मनी ट्रान्सफर एजन्सी (Western Union) :-

जगातील २०८ देशात राहणाऱ्या भारतीयांकडुन देशात पाठविण्यात येणाऱ्या पैशाचे विनियम केंद्र पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी मध्ये करण्यात आले आहे. वेस्टर्न युनियन (Western Union) तर्फे नवी मुंबईतील पतसंस्थामध्ये अशी सुविधा उपलब्ध होण्याचा मान सर्वप्रथम ''पारिजात'' संस्थेने मिळविला आहे.

## आभार :

सहकार क्षेत्रास उत्तम वळण लागावे, सहकार चळवळ बळकट व्हावी यासाठी प्रयत्नशील असलेले महाराष्ट्र राज्याचे मा. सहकार आयुक्त व विशेष निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे, मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था कोकण विभाग मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ठाणे, मा. उपनिबंधक सहकारी संस्था पुणे, मा. उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे तसेच संस्थाकार्यक्षेत्रातील सहकारी खात्याचे विविध पदाधिकारी त्यांचेही संस्था ऋणी आहे.

संस्थेच्या कार्यक्षेत्रातील ठाणे जिल्हा सहकारी बोर्ड कल्याण, महाराष्ट्र राज्य सह.बँक, ठाणे जिल्हा मध्य.सह.बँक , नवी मुंबई को-ऑप.बँक, कॉसमॉस को-ऑप.बँक, नॅशनल को-ऑप.बँक, अभ्युदय को-ऑप.बँक, महानगर सह.बँक , राजर्षी शाहु सहकारी बँक, ॲक्सिस बँक, सोपानकाका ना. सह.बँक, दि.सातारा सहकारी बँक, यांचे शाखाधिकारी व कर्मचारी यांची संस्था आभारी आहे.

संस्थेचे २००७-२००८ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षक मे. शशिकांत एस. काळे, अंतर्गत लेखापरिक्षक श्री.बी.आर.सावंत (सनदी लेखापाल), संगणकासाठी मे. कॉमविझार्ड सिस्टमस्, तसेच संस्थेचे कायदेविषयक सल्लागार यांनी संस्थेला आस्थेने मार्गदर्शन केल्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

संस्थेच्या प्रगतीसाठी अहोरात्र झटणारे संस्थेचे कर्मचारी, दै.ठेव प्रतिनिधी, सभासद व ठेवीदार आणि हितचिंतकांनी दिलेले सहकार्य व प्रोत्साहन यामुळेच संचालक मंडळ यशस्वी वाटचाल करू शकले त्याबद्दल आपणा सर्वांचे पुन्हा मन:पुर्वक आभार मानुन आपल्या लोभाची व सहकार्याची वृद्धी व्हावी अशी प्रार्थना करतो.

## श्रद्धांजली :

।। कुछ याद उन्हे भी करलो, जो लौटके घर ना आये ।।


हेमंत करकरे


अशोक कामटे


विजय साळसकर


तुकाराम ओंबळे


बापूसाहेब दुरुगडे


प्रकाश मोरे


जयवंत पाटील

दि.२६ नोव्हेंबर २००८ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातील सर्व शहीद पोलीस कर्मचारी व नागरीकांना 'पारिजात' परिवाराची भावपूर्ण श्रध्दांजली. तसेच भारतातील अन्य ज्ञात-अज्ञात थोर नेते, संशोधक,शास्त्रज्ञ,तंत्रज्ञ, साहित्यिक, पत्रकार,सैनिक, कलावंत शिक्षणतज्ञ,सामाजिक कार्यकर्ते, सहकार तज्ञ आपल्या संस्थेचे मान्यवर सभासद, ठेवीदार व हितचिंतक दिवंगत झालेले आहेत त्यांना ही सभा नम्रतापुर्वक अभिवादन करुन त्या सर्वांच्या पवित्र स्मृतीस भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**

आपला सहकारी

**कैलास खोपडे**

(अध्यक्ष)

दि. ३१ मार्च २००९

| सन २००७-०८ रु. पैसे | भांडवल व देणी | | सन २००८-०९ रु. पैसे |
|---|---|---|---|
| ५,००,००,०००.०० | **अधिकृत भाग भांडवल :** | | ५,००,००,०००.०० |
| १,०६,८५,०००.०० | **वसूल भाग भांडवल :** | | १,२१,१२,४००.०० |
| | **राखीव निधी व इतर निधी** | | |
| ३२,९४,७८३.०० | राखीव निधी | ३८,१३,०९५.०० | |
| ५८,०७,९११.०० | इमारत निधी | ६७,९४,५०६.०० | |
| १४,८९,०००.०० | संशयित बुडीत कर्ज निधी | १३,९०,०००.०० | |
| १,७५,०००.०० | लाभांश समानिकरण निधी | १,८५,०००.०० | |
| ५५,१५२.०० | सभासद कल्याण निधी | ४६,०३०.०० | |
| ५३,९९९.०० | धर्मादाय निधी | ५३,९९९.०० | |
| ४३,०००.०० | सेवक कल्याण निधी | ४३,०००.०० | |
| २०,२३२.०० | सहकार प्रशिक्षण निधी | १२,९५७.०० | |
| १,०३,७२५.०० | सेवक ग्रॅज्युईटी निधी | ०.०० | |
| ३६,०००.०० | आकस्मिक निधी | ९२,०००.०० | १,२४,३०,५८७.०० |
| | **सभासद ठेवी :** | | |
| १,९५,३०,०७४.०० | बचत ठेव | १,८३,२८,६४०.०० | |
| ४,३०,६९,७६५.०० | दैनंदिन बचत ठेव | ५,५९,३०,४७२.०० | |
| २९,५०,५७२.०० | सभासद ठेव | २८,७३,६९८.०० | |
| १,७६,४८,३६३.०० | अल्प मुदत ठेव | २,३८,५१,२१३.०० | |
| २,३०,६५,८७१.०० | मुदत ठेव | ३,३०,६४,५१०.०० | |
| १,६५,४३,८९६.०० | दामदुप्पट ठेव | १,९९,४८,३९८.०० | |
| ५७,५१५.०० | पारिजात बक्षीस ठेव -१९९८ | ३९,३२८.०० | |
| २,१२,००३.०० | पारिजात बक्षीस ठेव -२००० | १,७८,००३.०० | |
| १,१६,०००.०० | सिद्धी ठेव - २००१ | ७६,०००.०० | |
| २८,२३,४१०.०० | संकल्प सिद्धी ठेव - २००३ | ३०,१९,४६४.०० | |
| १,५९,२०,९५०.०० | मासिक प्राप्ती ठेव | १,९०,१८,०७५.०० | |
| १३,६६,८१८.०० | आवर्त ठेव | १६,७३,६९९.०० | |
| २,७२,७३,८१६.०० | शुभकार्य ठेव | ३,१०,३५,४५७.०० | |
| १,५४,५५,९१०.०० | धनवृद्धी ठेव | १,४३,८३,९६८.०० | |
| ०.०० | धन लक्ष्मी ठेव | १,७३,९५,२३८.०० | २४,०८,१६,१६३.०० |
| | **इतर देणी व तरतूदी :** | | |
| ७,५२,३४९.०० | ठेवीवरील देय व्याज | ६,०४,३३६.०० | |
| ६,४२,८७७.०० | लाभांश देणे | ६,७८,२३७.०० | |
| २७,०००.०० | रिटेंशन मनी | १,५०,०००.०० | |
| २०,९२,२०,९९१.०० | पुढील पानवर | | २६,५३,५९,१५०.०० |

## रोजीचे ताळेबंदपत्रक

| सन २००७-०८ रु पैसे | मालमत्ता व येणी | | सन २००८-०९ रु. पैसे |
|---|---|---|---|
| | **रोख व बँक शिल्लक :** | | |
| ८,३७,९४७.१० | रोख शिल्लक | ६,००,९४४.४६ | |
| ७,८९,९८३.०० | कॉसमॉस को-ऑप. बँक लि. | १९,८६,४७०.०० | |
| २७,००३.३० | महाराष्ट्र राज्य सह. बँक लि. | २८,७७६.७० | |
| १७,९९३.०० | ठाणे जिल्हा मध्य.सह.बँक लि. | ३४,७४३.०० | |
| २,७५,१२२.७९ | नवी मुंबई को-ऑप.बँक लि. | १६,०३,१३९.५२ | |
| १,५६,७८२.०२ | अभ्युदय को-ऑप.बँक लि. | ८,७५,०७८.३६ | |
| २,१५,४३७.५० | नॅशनल को-ऑप. बँक लि. | ७,८७,६८६.४५ | |
| १०,१५६.०० | अजित सहकारी बँक लि. | ७,१५६.०० | |
| ६,३३२.०० | राजर्षी शाहू सहकारी बँक लि. | १,२५,९३९.५० | |
| ०.०० | सारस्वत को-ऑप. बँक लि. | १०,८६३.०३ | |
| ५८,६६५.५४ | ॲक्सिस (यु.टी.आय.)बँक लि. | ३,८९,१७७.६० | |
| १४,३५५.०० | सोपानकाका सहकारी बँक लि. | २,३४३.०० | |
| ३,४७३.९८ | सातारा सहकारी बँक लि. | ४,७०,९६६.४८ | |
| २,९५०.०० | महानगर को-ऑप. बँक लि. | १२,०८१.०० | |
| १,३७५.०० | परिवर्तन को-ऑप. बँक लि. | ०.०० | ६९,३५,३६५.१० |
| | **गुंतवणूक :** | | |
| १,०००.०० | ठाणे जिल्हा मध्य सहकारी बँक -भाग | १,०००.०० | |
| ३,०००.०० | महा.राज्य सह.पत.फेडरेशन-भाग | ३,०००.०० | |
| ३३,४०,५३०.०० | ठाणे जि.म.सह.बँक - राखीव व इतर निधी | ३३,९९,२१०.०० | |
| १४,६५,०००.०० | महा.राज्य सह.बँक - राखीव व इ.निधी | २३,१५,०००.०० | |
| ५३,२०,०००.०० | ठाणे जि. मध्य.सह.बँक - मुदत ठेव | ३६,२०,०००.०० | |
| ५८,००,०००.०० | महा.राज्य सहकारी बँक - मुदत व आर्वत ठेव | ३६,५०,०००.०० | |
| १,१९,००,०००.०० | कॉसमॉस को-ऑप. बँक - मुदत व आर्वत ठेव | १,९७,४५,२०५.०० | |
| २०,००,०००.०० | सारस्वत को-ऑप. बँक - मुदत ठेव | २०,००,०००.०० | |
| २७,००,०००.०० | अभ्युदय को-ऑप.बँक - मुदत व आर्वत ठेव | ५४,००,०००.०० | |
| २१,७२,४९८.०० | नवी मुंबई को-ऑप.बँक - मुदत व आर्वत ठेव | ६४,३८,१६५.०० | |
| ५,००,०००.०० | द.म.कंळबे जावली सह.बँक लि.- मुदत ठेव | ५,००,०००.०० | |
| ०.०० | सातारा सहकारी बँक लि. - मुदत ठेव | ५,००,०००.०० | |
| ०.०० | ग्रेटर बॉम्बे को-ऑप. बँक लि.- मुदत ठेव | १०,००,०००.०० | |
| ०.०० | अपना सहकारी बँक लि.- मुदत ठेव | १०,००,०००.०० | |
| २५,००,०००.०० | यु.टी. आय. फंड | २५,००,०००.०० | ५,२०,७१,५८०.०० |
| | **सभासद कर्जे :** | | |
| ३,२५,८८,९६४.०० | वैयक्तिक जामिनकी कर्ज | ३,४०,६९,९३१.०० | |
| ११,२०,६२८.०० | व्यवसाय कर्ज | ५,०८,०४२.०० | |
| ४७,९६,३०१.०० | वाहन तारण कर्ज | ५८,०१,३९९.०० | |
| ७,८२,२५,४५४.०० | सुरक्षित तारण कर्ज | १०,३१,८०,५११.०० | |
| ९३,९५,७६६.०० | इतर तारण कर्ज | ८५,२०,६५१.०० | |
| १६,७०,४५,९१७.२३ | पुढील पानवर..... | | ५,९०,०६,९४५.१० |

दि. ३१ मार्च २००९

| सन २००७-०८ रु. पैसे | भांडवल व देणी | | सन २००८-०९ रु. पैसे |
|---|---|---|---|
| २०,९२,२०,९९१.०० | मागील पानावरुन....... | | २६,५३,५९,१५०.०० |
| ९,९९९.०० | अधिभार (सरचार्ज) देणे | २५,३७०.०० | |
| ११,९००.०० | शेअर्स अनामत खाते | ५,९००.०० | |
| ५,२९०.०० | व्यवसाय कर | ७,६१५.०० | |
| ३२,८०२.०० | आयकर टी.डी. एस. | ५१,३७८.०० | |
| ३३,३११.०० | सेवक भविष्य निर्वाह निधी | ५२,४३२.०० | |
| १,६०,०००.०० | लेखापरिक्षण फी | २,००,०००.०० | |
| ५,०००.०० | शिक्षण निधी | ५,०००.०० | |
| ५,१७०.०० | कर्मचारी विमा हप्ता | ६,३७३.०० | |
| २०,०००.०० | अतिरिक्त लाभ कर | ६,०००.०० | |
| १२,९००.०० | टेलिफोन बिल | १३,३००.०० | |
| २०,६००.०० | विज बिल | २१,४००.०० | |
| ०.०० | व्यवसायिक फी | ५,०००.०० | १८,३२,३४१.०० |
| ९,९६,०००.०० | **थकीत व्याज निधी तरतूद :** | | १०,५०,०००.०० |
| | **नफा तोटा खाते :** | | |
| ४०६.११ | मागील वर्षाचा शिल्लक नफा | ९४७.९२ | |
| १२,१९,२८६.८१ | आधिक : चालू वर्षाचा नफा | १२,३२,२२६.६८ | १२,३३,१७४.६० |
| २१,१७,५२,८५५.९२ | एकूण | | २६,९४,७४,६६५.६० |

बी. आर. सावंत अॅन्ड कं.
चार्टर्ड अकौटंट -अंतर्गत हिशोब तपासणीस

श्री. विजय बं. मोरे
मुख्य कार्यकारी अधिकारी

## रोजीचे ताळेबंदपत्रक

| सन २००७-०८ रु. पैसे | मालमत्ता व येणी | | सन २००८-०९ रु. पैसे |
|---|---|---|---|
| १६,७०,४५,९१७.२३ | **मागील पानावरुन........** | | ५,९०,०६,९४५.१० |
| १३,७६,७२१.०० | शासकिय रोखे कर्ज | ११,३९,८२०.०० | |
| १२,४५,५०१.०० | दावा दाखल कर्ज | २२,८१,२७२.०० | |
| १०,७९,६०१.०० | कर्मचारी वैयक्तिक कर्ज | ११,९३,०७३.०० | |
| २,३८,८९६.०० | कर्मचारी वाहन कर्ज | १,५६,६१५.०० | |
| ३,०६,५८७.०० | कर्मचारी घरतारण कर्ज | २,६०,३४८.०० | |
| १०,४०,४५०.०० | दैनंदिन ठेव प्रतिनिधी कर्ज | ११,१२,९२७.०० | |
| १,७५,९१,१७४.०० | ठेव तारण कर्ज | २,३३,९६,५२०.०० | |
| १४,५६,०८६.०० | सोने तारण कर्ज | ७,५५,२३१.०० | १८,२३,७६,४२०.०० |
| | **मालमत्ता :** | | |
| ३०,६५,३७७.०० | फर्निचर व फिक्चर्स खाते | ५४,३७,०१९.०० | |
| ११,२१,३५७.०० | संगणक खाते | १४,५०,८०८.०० | |
| २,५२,००३.०० | वातानुकूलीत यंत्रे खाते | ३,५६,२१०.०० | |
| ९१,९११.०० | इलेक्ट्रीक साधन सामुग्री खाते | ३,८१,४१५.०० | |
| २,०५,५२३.०० | कार्यालय साधन सामुग्री खाते | २,६९,९२१.०० | |
| ३५,५५०.०० | इनव्हर्टर खाते | ५०,३८५.०० | |
| ७७,५१,१६०.०० | इमारत खाते | १,११,७८,८७६.०० | |
| १९,४२२.०० | डेली कलेक्शन मशिन खाते | ४४,२२१.०० | |
| १,५९२.०० | ग्रंथालय खाते | १,४७८.०० | |
| ०.०० | मोबाईल फोन खाते | २१,०४४.०० | १,९१,९१,३७७.०० |
| | **येणे व्याज :** | | |
| ९,९५,२११.०० | सभासद कर्जावरील येणे व्याज (ओव्हरडयु) | १०,४७,७३६.०० | |
| ०.०० | सभासद कर्जावरील येणे व्याज (नॉन ओव्हरडयु) | १,५९,८६९.०० | |
| ५६,६१,८७८.०० | गुंतवणूकीवरील येणे व्याज | ६३,१३,७२४.०० | ७५,२१,३२९.०० |
| | **इतर येणी :** | | |
| ५,६०,०००.०० | कार्यालय अनामत | ५,३०,०००.०० | |
| १०,०५०.०० | दुरध्वनी सुरक्षा ठेव | १०,५५०.०० | |
| २४,२१०.०० | वीज सुरक्षा ठेव | ४२,२६०.०० | |
| ०.०० | पाणी कनेक्शन सुरक्षा ठेव | ३,५००.०० | |
| ५,०००.०० | बि.ई.एस.टी. सुरक्षा ठेव | ५,०००.०० | |
| २,३६,६१४.०० | स्टेशनरी स्टॉक | २,६६,०१४.५० | |
| ८,८००.०० | मुद्रांक साठा | ८,०५०.०० | |
| ३०,७००.०० | आगाऊ विमा | ३८,५५०.०० | |
| ३,२९३.०० | टी.डी.एस. व इतर येणे खाते | ९,४५४.०० | |
| १,७९,९६६.०० | प्राथमिक खर्च (शाखा उद्‌घाटन) | २,७३,१०१.०० | |
| ०.०० | आगाऊ ग्रज्युइटी पेमेंट | ५५,४८५.०० | |
| ९०,६०५.६९ | वेस्टर्न युनियन मनी ट्रान्सफर येणे | ०.०० | १२,४२,०४४.५० |
| | **ॲडव्हान्स :** | | |
| २१,७००.०० | दै.ठेव प्रतिनिधी मशीन ॲडव्हान्स | | १,३६.५५०.०० |
| २१,१७,५२,८५५.९२ | एकूण | | २६,९४,७४,६६५.६० |

| श्री. कृष्णा पां. धुमाळ | श्री. बाळासाहेब वि. ताकवले | श्री. कैलास वि. खोपडे |
|---|---|---|
| खजिनदार | सचिव | अध्यक्ष |

दि. ३१ मार्च २००९

| सन २००७-०८ रु. पैसे | खर्च | सन २००८-०९ रु. पैसे |
|---|---|---|
| १,२९,५६,७४४.०० | सभासद ठेवीवरील व्याज | १,४८,४९,१०१.०० |
| २४,६०,६९१.०० | कर्मचारी पगार, बोनस व भत्ता | ३८,३७,६३५.०० |
| १,८०,९०२.०० | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संस्था अंशदान | ३,०९,४७५.०० |
| ३५,०००.०० | कर्मचारी सेवा उपदान (ग्रुप ग्रॅज्युइटी - LIC) | २,३१,०६१.०० |
| ३२,८८,७८२.०० | दैनंदिन ठेव प्रतिनिधी कमिशन | ४३,३२,५७२.०० |
| ६,०४,५००.०० | कार्यालय भाडे | ६,२५,८४०.०० |
| २,२७,२६७.५० | छपाई व स्टेशनरी खर्च | २,२९,५२३.५० |
| ४२,६४०.०० | वार्षिक अहवाल खर्च | ४८,८८०.०० |
| १,३८,९६२.०० | किरकोळ खर्च | १,५१,६००.०० |
| २,७०,८३६.०० | विज खर्च | ३,०१,९५६.०० |
| १,२७,८६४.०० | टेलिफोन खर्च | १,५४,८०४.०० |
| १,००,९३६.०० | प्रवास खर्च | १,०४,३५१.०० |
| ४६,३९५.०० | विमा खर्च | ५३,६३३.०० |
| ३८,१६९.०० | तार व टपाल खर्च | ३१,९७५.०० |
| २७,२११.०० | कार्यालय दुरुस्ती व देखभाल खर्च | ३३,५०९.०० |
| ३,०९६.०० | कार्यालय पाणी बिल खर्च | १,७९८.०० |
| १,३७,५००.०० | दिनदर्शिका छपाई खर्च | ५४,३२८.०० |
| १,१५०.०० | संगणक दुरुस्ती व देखभाल खर्च | २,८९८.०० |
| १,४७,६०७.०० | संगणक दुरुस्ती व देखभाल (A.M.C.) | २,२१,७३१.०० |
| ०.०० | वातानुकूलीत यंत्रे (A.M.C.) | ४,८३१.०० |
| १३,२००.०० | कार्यालय साफसफाई (A.M.C.) | २०,९००.०० |
| १०,८९९.०० | डेली कलेक्शन मशिन (A.M.C.) | १,७५०.०० |
| ९,८२२.०० | कार्यालय मालमत्ता कर खर्च | १,००,८६९.०० |
| ४,७३५.०० | कार्यालय देखभाल शुल्क | ०.०० |
| ४९,८११.०० | कार्यालय साफसफाई खर्च | ५४,७२२.०० |
| १,६२,७८४.०० | लेखापरिक्षण फी (शासकीय/अंतर्गत) | २,२१,८८४.०० |
| १०,९७०.०० | कायदे विषयक सल्लागार फी | ११,००८.०० |
| २,५००.०० | व्यवसाय कर खर्च (संस्था) | २,५००.०० |
| २,१००.०० | सभासदत्व व वर्गणी | १,०००.०० |
| १७,६००.०० | दिपावली भेट खर्च | ९.०३५.०० |
| ५९,९३४.०० | पुजा खर्च | ८८,३३९.०० |
| २९,१९६.४७ | बॅंक चार्जेस खर्च | ६१,४३९.१७ |
| २,१२,०९,८०३.९७ | पुढील पानवर..... | २,६१,५४,९४७ ६७ |

## रोजीचे नफा-तोटा पत्रक

| सन २००७-०८ रु. पैसे | उत्पन्न | सन २००८-०९ रु. पैसे |
|---|---|---|
| २८,१२,४९१.०० | गुंतवणुकीवरील व्याज | ३७,६७,०७८.०० |
| २,१०,२२,६८६.०० | सभासद कर्जावरील व्याज | २,४७,४६,५५१.०० |
| ४,२६,०९०.०० | कर्ज प्रोसेसिंग चार्जेस जमा | ५,१२,४४९.०० |
| २,२५,७१०.०० | कर्ज वसुली चार्जेस जमा | ३,१५,१२४.०० |
| १,६४,६७६.७८ | फॉर्म फी, स्टेशनरी चार्जेस इ. | १,९६,६९९.३५ |
| १५०.०० | लाभांश | १५०.०० |
| ०.०० | इतर जमा | ३,६३,७२५.०० |
| २,४६,५१,८०३.७८ | पुढील पानवर..... | २,९९,०१,७७६.३५ |

दि. ३१ मार्च २००९

| सन २००७-०८ रु. पैसे | खर्च | सन २००८ ०९ रु. पैसे |
|---|---|---|
| २,१२,०९,८०३.९७ | मागील पानावरुन....... | २,६१,५४,९४७.६७ |
| ५,०३,८४९.०० | अधिकर्ष खाते व्याज | ५,४२,८९६.०० |
| ४२,३५१.०० | सर्विस टॅक्स | १०,९६३.०० |
| २,८५०.०० | कर व परवाना फी | ४,७७०.०० |
| ३२,००७.०० | अतिरिक्त लाभ कर | २५,७४२.०० |
| २४,८०३.०० | वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | ४६,१६९.०० |
| ५,०००.०० | शिक्षण निधी तरतूद | ५,०००.०० |
| ५७,२७८.०० | प्राथमिक खर्च निर्लेखित | १४,७७८.०० |
| ५४,६५०.०० | संचालक सभा भत्ता खर्च | ४९,७००.०० |
| ३,०००.०० | सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट चार्जेस | १,९८०.०० |
| ८,८१४.०० | फेस्टिवल सेलिब्रेशन खर्च | ११,९३७.०० |
| ४४,१६५.०० | भेट व तपासणी खर्च | ४४,२९७.०० |
| १,०००.०० | लॉकर भाडे | ०.०० |
| १,३६,३३७.०० | कर्ज वसुली खर्च | १,५९,५९७.०० |
| ३५,३५१.०० | जाहिरात खर्च | १२,००४.०० |
| ०.०० | सिक्युरिटी गार्ड खर्च | ४९,३२४.०० |
| ०.०० | निवडणूक खर्च | ६२,५२२.०० |
| ३,४२,०००.०० | संशयित व बुडित कर्ज व थकीत व्याज निधी तरतूद | ४,०००.०० |
| ९,२९,२५८.०० | घसारा | १३,८८,९२३.०० |
| १२,१९,२८६.८१ | निव्वळ नफा ताळेबंद वर्ग | १२,३२,२२६.६८ |
| २,४६,५१,८०३.७८ | एकूण | २,९९,०१,७७६.३५ |

बी. आर. सावंत ॲन्ड कं.
चार्टर्ड अकौटंट -अंतर्गत हिशोब तपासणीस

श्री. विजय बं. मोरे
मुख्य कार्यकारी अधिकारी

## रोजीचे नफा-तोटा पत्रक

| सन २००७-०८ रु. पैसे | उत्पन्न | सन २००८-०९ रु. पैसे |
|---|---|---|
| २,४६,५१,८०३.७८ | मागील पानावरुन........ | २,९९,०१,७७६.३५ |
| २,४६,५१,८०३.७८ | एकूण | २,९९,०१,७७६.३५ |

श्री. कृष्णा पां. धुमाळ
खजिनदार

श्री. बाळासाहेब वि. ताकवले
सचिव

श्री. कैलास वि. खोपडे
अध्यक्ष

## वैधानिक लेखापरीक्षकाचा अहवाल : (सन २००७-०८)

(महाराष्ट्र सहकारी संस्थाचा कायदा कलम ८१ (५-ब) आणि महाराष्ट्र सहाकारी संस्थाचा नियम ६९ अन्वये द्यावयाचा)

**मी, पारिजात को-ऑप.क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई**

या संस्थेचे दि. ३१.०३.२००८ रोजीचे ताळेबंद पत्रक आणि त्या दिवशी संपणाऱ्या वर्षाचे नफा-तोटा पत्रक लेखापरीक्षण करुन सोबत जोडलेली आहेत. हि हिशोबी पत्रके तयार करण्याची जबाबदारी संस्थेच्या व्यवस्थापनाची आहे. या आर्थिक पत्रकाचे लेखापरीक्षण करुन त्यावर मत प्रदर्शित करण्याची आमची जबाबदारी आहे.

साधारणतः भारतामध्ये स्विकृत झालेल्या लेखापरीक्षण मान्यकांनुसार आम्ही संस्थेचे लेखापरीक्षण केलेले आहे. या लेखापरीक्षण मान्यकांनुसार आम्ही लेखापरीक्षण कार्यक्रम आखुन व त्याप्रमाणे काम करुन विश्वासपुर्वक असे पाहिले आहे की, सदर आर्थिक पत्रकांत कोणतेही महत्वाचे दोष राहु नयेत. लेखापरीक्षणात चाचणी तपासणी तसेच आर्थिक पत्रकांतील रक्कमांच्या संदर्भात कागदपत्रे तपासून या रकमा पत्रकांत योग्यरीत्या दाखविलेल्या असल्या बद्दलची खात्री करणे त्याच प्रमाणे मान्यता प्राप्त लेखांकन सिद्धांताप्रमाणे आर्थिक पत्रकांचे मुल्यांकन या लेखापरीक्षणात समाविष्ट आहे. त्यामुळे आम्ही केलेल्या लेखापरीक्षणाप्रमाणे प्रस्तुत वाजवीरीत्या मत प्रदिर्शित करण्याबद्दल आम्हाला खात्री आहे.

त्याप्रमाणे मी आभिप्राय देतो की,

१. आमच्या लेखापरीक्षणाच्या संदर्भात, आमच्या ज्ञानाप्रमाणे आणि विश्वासाप्रमाणे, आम्ही संस्थेकडून मागितलेली सर्व माहिती व स्पष्टीकरणे आम्हाला समाधानकारक वाटली.

२. संस्थेचे ताळेबंद आणि नफा-तोटा पत्रके हि महाराष्ट्र सहकारी सोसायटयांचा कायदा व त्या खालील नियमानुसार तयार केलेली आहेत.

३. संस्थेचे ताळेबंद आणि नफा-तोटा पत्रके हि संस्थेच्या हिशोबी व विवरणे या बरोबर मिळती जुळती आहेत.

४. माझ्या मते मला दिलेल्या माहीती व स्पष्टिकरणानुसार त्याचप्रमाणे या आर्थिक पत्रकावर दिलेल्या स्वतंत्र टिपणानुसार आणि अलहिदा दिलेल्या शेऱ्यास पात्र राहून तसेच भारतामध्ये साधारण : स्विकृत असलेल्या लेखापरीक्षण मान्यकांनुसार :

अ) ताळेबंद पत्रक सोसायटीची दि. ३१ मार्च २००८ ची आणि खरी व योग्य स्थिती दाखविते,

ब) नफा-तोटा पत्रक दि.३१ मार्च २००८ रोजी संपलेल्या वर्षाचा खरा व योग्य नफा दर्शविते.

५. सन २००७-२००८ या सहकारी वर्षासाठी लेखापरीक्षण वर्ग **'अ'** देण्यात आला आहे.

६. वरील दाखला प्रसारित करण्यात येणाऱ्या लेखापरीक्षण प्रतिवृत्तातील भाग **अ**, **ब**, व **क** मधील शेऱ्यास पात्र राहून देण्यात येत आहे.

**शशिकांत स. काळे**
सनदी लेखापाल
(भागीदार, लिमये काळे आणि कंपनी)

स्थळ : चिपळून
दिनांक : २१/१०/०८
सादर दिनांक : ०५/१२/०८

## अंतर्गत हिशोब तपासणीसांचा अहवाल : (सन २००८-०९)

आम्ही, पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई या संस्थेचा सोबत जोडलेला ३१ मार्च २००९ रोजीचा ताळेबंद आणि त्याच तारखेस संपणाऱ्या वर्षाचे नफा-तोटा पत्रक तपासले आहे. ह्या आर्थिक पत्रकाची जबाबदारी संस्थेच्या व्यवस्थापनाची आहे. आमची जबाबदारी लेखापरीक्षण केल्यानंतर ह्या आर्थिक पत्रकाबाबत मत प्रदर्शित करण्याची आहे.

सर्वसाधारण भारतात स्विकारल्या जाणाऱ्या स्टँडर्डस्प्रमाणे आम्ही लेखा परिक्षण केले आहे. या स्टँडर्डस्प्रमाणे आम्हाला लेखा परिक्षण करताना असे नियोजन व रचना करावी लागते की, पुरेसा विश्वास प्राप्त व्हावा जेणेकरुन ह्या आर्थिक पत्रकामध्ये लक्ष देण्याजोग्या चुका राहू नयेत. चाचणी पध्दतीने तपासणी रक्कमेबाबत पुरावा आणि आर्थिक पत्रकातील दर्शविलेली विधाने याचा लेखापरिक्षणात समावेश आहे. अनुसरलेली हिशोबाचे तक्ते व व्यवस्थापनाने तयार केलेले सार्थ अंदाज तसेच एकंदरीत आर्थिक पत्रकाच्या मांडणीबद्दल मुल्यांकन करणे याचा देखील लेखापरिक्षणात समावेश आहे. आमचा विश्वास आहे की, आम्ही केलेले लेखापरिक्षण आमचे मत मांडणीसाठी पुरेसे आहे. उपरोक्त पत्रकाबद्दल आम्ही जोडलेल्या टिप्पणी व शेऱ्यास अधिन राहुन आम्ही खालील निवेदन करीत आहोत.

१) आमच्या समजुतीप्रमाणे व माहितीप्रमाणे लागणारी माहिती व खुलासे आम्हांस मिळाले आहेत.

२) हिशोबाच्या पुस्तकाचे तपासणीबाबत महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थेचे अधिनियम १९६० व संस्थेचे पोटनियमानुसार योग्य ती पुस्तके ठेवण्यात आलेली आहेत.

३) संस्थेचे ताळेबंद व नफा-तोटा पत्रके संस्थेच्या हिशोब पुस्तकाशी जुळणारी आहेत.

४) आम्हास मिळालेल्या माहिती व खुलाशावरुन आमच्या मते सोबत जोडलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रक महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थेचे अधिनियम १९६० व त्या खालील नियमान्वये जरुर ती माहिती योग्य प्रकारे पुरवितात.

अ. ताळेबंदपत्रक दि. ३१-०३-२००९ अखेरच्या व्यवहाराची व

ब. नफा-तोटा पत्रकाच्या बाबतीत दि. १-४-२००८ ते ३१-०३-२००९ या कालावधीत नफा अंतर्गत लेखा परिक्षण अहवालास पात्र राहून व रास्त स्थिती दर्शवित आहे.

**बी. आर. सावंत ॲण्ड कं. करिता**
सनदी लेखापाल
सही
(बी.आर. सावंत)
प्रोप्रायटर

स्थळ : नवी मुंबई
दिनांक : १३/६/२००९

## अंदाज पत्रक सन २००९-२०१०

(रु.लाखात)

| उत्पन्न | अंदाजे उत्पन्न २००८-२००९ | प्रत्यक्ष उत्पन्न २००८-२००९ | अंदाजे उत्पन्न २००९-२०१० |
|---|---|---|---|
| कर्जावरील व्याज | २९९.४७ | २४७.४७ | ३०४.०० |
| गुंतवणुकीवरील व्याज | ३०.९३ | ३७.६७ | ४७.०० |
| इतर उत्पन्न | ७.९० | १३.८८ | १८.०० |
| एकूण रु. | ३३८.३० | २९९.०२ | ३६९.०० |

| खर्च तपशील | अंदाजे खर्च २००८-२००९ | प्रत्यक्ष खर्च २००८-२००९ | अंदाजे खर्च २००९-२०१० |
|---|---|---|---|
| सभासद ठेवीवरील व्याज | १८५.४६ | १४८.४९ | १८०.०० |
| कर्मचारी पगार, बोनस,भ.निर्वाह निधी व ग्रज्युईटी खर्च* | ३२.१२ | ४३.७८ | ५२.०० |
| दैंनदिन ठेव प्रतिनिधी कमिशन* | ३७.८२ | ४३.३३ | ५१.५० |
| छपाई व स्टेशनरी, अहवाल व कॅलेंडर छपाई खर्च | ५.०८ | ३.३३ | ५.५० |
| वार्षिक सभा व संचालक भत्ता खर्च | ०.९८ | ०.९६ | १.५० |
| प्रवास, किरकोळ, दिवाळी भेट, गणवेश, व्हिजीट खर्च | ५.३८ | ३.०९ | ५.३० |
| विमा व पोस्टेज खर्च | १.२७ | ०.८६ | १.०० |
| विज,फोन,पाणी,कर,कार्यालय भाडे, सर्विस टॅक्स, लायसन्स फी व अतिरिक्त लाभ कर इ. | १३.६५ | १२.२८ | १५.७५ |
| देखभाल व दुरुस्ती,उद्घाटन,पुजा,फेस्टीव्हल,कार्यालय सर्विस चार्ज,साफसफाई खर्च,सिक्युरिटी गार्ड खर्च | ४.५० | ३.३३ | ६.०० |
| ऑडीट फी खर्च * | १.९० | २.२२ | ३.०० |
| AMC वर्गणी, व्यवसाय कर कायदेशीर सल्लागार फी* | २.५० | २.६६ | ३.७६ |
| ओव्हर ड्राप्ट कर्ज व्याज, बँक चार्जेस व लॉकर भाडे | ७.०० | ६.०४ | ८.५० |
| कर्ज वसुली व जाहिरात खर्च | ३.०० | १.७२ | २.५० |
| घसारा खर्च | १६.५० | १३.८९ | १६.६५ |
| तरतूदी (शिक्षण निधी व बुडीत कर्ज निधी) | ५.०० | ०.०९ | १.०० |
| अन्य खर्च * | -- | ०.६३ | १.०० |
| नफा | १६.१४ | १२.३२ | १४.०४ |
| एकूण रु. | ३३८.३० | २९९.०२ | ३६९.०० |

*अंदाजापेक्षा अधिक झालेल्या खर्चास संचालक मंडळाने मंजुरी दिली असून वा.स.सा. सभेच्या मंजुरीसाठी शिफारस करीत आहोत.

## संचालक कर्जाचा तपशिल :

| ३१-०३-२००९अखेर येणे कर्ज | ३१-०३-२००९अखेर थकबाकी | थकबाकीचे प्रमाण |
|---|---|---|
| २७,९०,४४९.०० | ०.०० | ०.०० |

## संचालक नातेवाईक कर्जाचा तपशिल :

| ३१-०३-२००९अखेर येणे कर्ज | ३१-०३-२००९अखेर थकबाकी | थकबाकीचे प्रमाण |
|---|---|---|
| ३८,००,७८४.०० | ०.०० | ०.०० |

## संस्थेची गत पाच वर्षातील आर्थिक प्रगती

| सन | २००४-२००५ | २००५-२००६ | २००६-२००७ | २००७-२००८ | २००८-२००९ |
|---|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | ७८,४६,००० | ८३,३८,५०० | ९५,३५,७०० | १,०६,८५,००० | १,२१,१२,४०० |
| गुंतवणूक | २,००,९८,८५० | ३,०२,९८,८५० | ३,३२,५१,८५० | ३,७७,०२,०२८ | ५,२०,७१,५८० |
| ठेवी | ८,७५,६७,६२८ | ११,०२,३८,३६९ | १५,०७,८९,४७९ | १८,६०,३४,९६३ | २४,०८,१६,१६३ |
| कर्जे | ६,९५,०५,४२१ | ८,०४,५४,७५५ | ११,८२,००,२८१ | १५,१२,६२,१२९ | १८,२३,७६,४२० |
| खेळते भांडवल | १०,४९,१०,२८३ | १२,९६,१२,२१४ | १७,३२,६६,७६४ | २१,१७,५२,८५५ | २६,९४,७४,६६५ |

## सभासदांना सूचना :

- सभासदाने आपला पत्ता बदलल्यास नवीन पत्त्या च्याविषयी कार्यालयास लेखी सुचना त्वरीत करावी.
- ज्या सभासदांनी आपले वारस नेमले नसतील त्यांनी आपले वारस नेमून घ्यावेत.
- सर्व सभासदांचे लाभांश व भाग दाखले तयार आहेत ते संबंधीत शाखेतून घेऊन जावेत.
- कर्ज मागणी करताना सभेपूर्वी ३ दिवस अगोदर कर्ज मागणी अर्ज शाखेत जमा करावेत.
- पूर्ण भरलेले व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेले अर्ज कर्ज मंजूर सभेत ठेवले जातील.
- आपण घेतलेल्या कर्जाचे हप्ते वेळेवर भरा व संस्थेस सहकार्य करा.
- प्रत्येक महिनाच्या शेवटी आपले कर्ज, दैनंदिन ठेव, आर. डी. याबाबतचे पासबुकावर संस्थेत येऊन अधिकाऱ्यांची सही घ्यावी,
- संस्थेच्या व सभासदांच्या हिताच्या दृष्टीने आपला सल्ला व मार्गदर्शन लेखी स्वरुपात कळवा.



# पारिजात

## को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई

## विद्यार्थी गुण गौरव सोहळा
### सन २००८-०९

**सभासदांच्या हुशार मुलांचा गुणगौरव वार्षिक सर्व साधारण सभेत केला जाणार आहे. सभासदांना विनंती करण्यात येते की, त्यांनी २००८-०९ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १०वी आणि १२ वी परीक्षेत कमीत कमी ७०% गुण असलेल्या मुलांचे अर्ज दिनांक ४/८/२००९ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात त्वरीत पाठवावे. अधिक माहितीसाठी कार्यालयात संपर्क साधावा.**

---

## सन २००७-०८ मधील गुणवंत विद्यार्थी

**संस्थेने दि. ९ ऑगस्ट २००८ रोजीच्या ११ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत पूढील विद्यार्थ्यांचा रोख बक्षिस व स्मृतीचिन्ह देऊन गुणगौरव करण्यात आला होता.**

**इयत्ता १० वी**

| क्रमांक | विद्यार्थ्यांचे नांव | टक्केवारी | शाखा |
|---|---|---|---|
| प्रथम | प्रमोद रविकिरण चव्हाण | ९०.९२ % | धनकवडी |
| द्वितीय | पल्लवी ज्ञानदेव घाटगे | ८९.२३ % | चंदननगर |
| द्वितीय | प्रियांका बाळासाहेब शिंदे | ८९.२३ % | धनकवडी |
| तृतीय | आनंद अनिल खराडे | ८९.०७ % | नेरुळ |

**इयत्ता १२ वी**

| क्रमांक | विद्यार्थ्यांचे नांव | टक्केवारी | शाखा |
|---|---|---|---|
| प्रथम | निलेश बाबाजी शिरसाट | ८१.६७ % | वाशी |
| द्वितीय | शलाका ज्ञानदेव शेवाळे | ८०.६७ % | वाशी |
| तृतीय | कल्पेश दिलीप सोनावणे | ७७.०० % | नेरुळ |

# परिशिष्ट - 'अ'

| | | |
|---|---|---|
| संस्थेचे नांव | : | पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई - ४०० ७०६. |
| मुख्य कार्यालय | : | पारिजात भवन, प्लॉट न. १८, सेक्टर १०ए, नेरुळ, नवी मुंबई- ४०० ७०६. |
| नोंदणी क्रमांक | : | टी.एन.ए.(टी.एन.ए.)/आर.एस.आर. (सी.आर.) ९५१-९७ |
| कार्यक्षेत्र | : | बृहन्मुंबई, ठाणे, रायगड व पुणे जिल्हा |
| शाखा | : | नऊ (मुख्य कार्यालय व्यतिरिक्त नऊ शाखा) |
| सभासद संख्या | : | ५१६७ |
| अधिकृत भाग भांडवल | : | रु. ५,००,००,०००.०० |
| वसुल भाग भांडवल | : | रु. १,२१,१२,४००.०० |
| राखीव व इतर निधी | : | रु. १,२४,३०,५८७.०० |
| ठेवी | : | रु. २४,०८,१६,१६३.०० |
| कर्जे | : | रु. १८२३,७६,४२०.०० |
| बाहेरील कर्जे | : | नाही |
| गुंतवणूक | : | रु. ५,२०,७१,५८०.०० |
| लेखापरिक्षण वर्ग | : | "अ" |
| अहवाल सालातील नफा | : | रु. १२,३३,१७४.६० |
| कर्मचारी वर्ग | : | ३९ |
| खेळते भांडवल | : | रु. २६,९४,७४,६६५.६० |

## विविध ठेव योजना :-

### 'नातवा' पासून 'आजोबा' पर्यंत.... कुटुंबातील सर्वांसाठी

**व्याजदर (दि. ३/७/२००९ पासून)**

| | |
|---|---|
| ४६ ते १८० दिवस | ८.०० % |
| १८१ ते ३६४ दिवस | ९.०० % |
| १ वर्ष ते २ वर्षापेक्षाकमी | १०.०० % |
| २ वर्ष ते ३ वर्षापेक्षाकमी | १०.२५ % |
| ३ वर्ष ते ४ वर्षापेक्षाकमी | १०.५० % * |
| ४ वर्ष ते ५ वर्षापेक्षाकमी | ११.०० % |
| ५ वर्ष व आधिक | १०.०० % |

* जेष्ठ नागरिकांना ½ % अधिक व्याज

**मासिक प्राप्ती योजना**

खास पेन्शनर व VRS घेतलेल्यांसाठी रु. १,०९,१००/-गुंतवा व दरमहा रु. १०००/- पेन्शन रुपये व्याज मिळवा.

**शुभकार्य ठेव योजना**

| दरमहा | भरा | मिळवा |
|---|---|---|
| रु. ६००/- | फक्त ६६ महिने | रु. ५०,०००/- |
| रु. १२००/- | | रु. १,००,०००/- |

**लखपती मुदत ठेव योजना**

| | | |
|---|---|---|
| रु. ६२,१००/- | ५ वर्षात | रु.१ लाख |
| रु. ५८,२५०/- | ६८ महिन्यात | रु. १ लाख |

**दामदुप्पट ठेव योजना**

डबल धमाका

आपली रक्कम ८४ महिन्यात दामदुप्पट

पारिजात चा सुगंध सदैव मोहक असतो पारिजात मधील ठेव सदैव सुरक्षित असते.

## विविध कर्ज योजना :-

### स्वप्न तुमचे ... सहाय्य आमचे

❋ गृहपयोगी उपकरणे ❋ फर्निचर ❋ संगणक ❋ शिक्षण ❋ वाहन ❋ मशिनरी ❋ घरदुरुस्ती ❋ लग्नकार्य ❋ वैद्यकीय ❋ धार्मिक कार्य ❋ व्यवसाय वृद्धी

### विविध कर्ज योजना

**वैयक्तीक कर्ज**
रु. ७५,०००/-
व्याजदर १७%

**वाहन तारण कर्ज**
रु. १०.०० लाख
व्याजदर १६%

**तारण कर्ज**
रु. १०.०० लाख पर्यंत
व्याजदर १६%

**तत्काळ कर्ज**
ठेव तारण
LIC / NSC
सोने तारण



नुतन प्रशासकीय कार्यालयाचे उदघाटन करताना खासदार मा.श्री. आनंदरावजी अडसुळसाहेब (मा.केंद्रीय अर्थ राज्यमंत्री), मा.श्री. रमेश शिंदे (जेष्ठ नगरसेवक) व मा.श्री.विजय माने (नगरसेवक), मा.श्री.कोंडीबा तिकोने (नगरसेवक)

नुतन कार्यालयाच्या उदघाटना प्रसंगी उपस्थित पाहुणे व सभासदांना संबोधताना मा.श्री. आनंदराव अडसुळसाहेब सोबत श्री. रमेश शिंदे श्री. अशोकशेठ गावडे व संस्थेचे अध्यक्ष श्री. कैलास खोपडे






नुतन प्रशासकिय कार्यालयाच्या उदघाटन प्रसंगी उपस्थित विवीध क्षेत्रातील मान्यवर पाहुणे, सभासद व हितचिंतक

शिक्षक दिनानिमीत्त चंदननगर शाखेतील शिक्षक सभासदांचा सन्मान करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष श्री. कैलास खोपडे यांच्या हस्ते सन्मान स्विकारताना शिक्षक श्री.संपतराव कोहकडे





संस्थेच्या न्यु पनवेल शाखेच्या वर्धापन दिनानिमीत्त आयोजीत मधुमेह व रक्तगट तपासणी शिबीराचा लाभ घेताना सभासद सोबत संस्थेचे अध्यक्ष श्री.कैलास खोपडे व सचिव श्री. बाळासाहेब ताकवले.

# आपल्या सेवेत कार्यरत आमच्या शाखा

## मुंबई विभाग

| | |
|---|---|
| वाशी | अे-३/७, सेक्टर १५, मराठा भवन मार्ग, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३. फोन : २७८०२६५९ / ३२०८६६६४ |
| नेरुळ | साईप्रसाद शॉपिंग कॉम्प्लेक्स, शॉप नं. २८, प्लॉट नं. १७, सेक्टर ८, नेरुळ, नवी मुंबई - ४०० ७०६. फोन : ३२५९६९८५ |
| दादर | सुभद्रा बिल्डींग, रुम नं. ११, बी-९, पहिला मजला, आर. के. वैद्य रोड, दादर (प.), मुंबई - ४०० ०२८. फोन : ३२०८६६६५ |
| कोपरखैरणे | शॉप नं. २, प्लॉट नं. १९, स्वागत अपार्टमेंट, सेक्टर ३, कोपरखैरणे, नवी मुंबई - ४०० ७०९. फोन : ३२४८६८०६ |
| न्यु पनवेल | अश्वमेघ, शॉप नं.१७, प्लॉट नं. १८, सेक्टर ८, सातारा सह. बँकेसमोर, खांदा कॉलनी, न्यु पनवेल - ४१० २०६. फोन : ३२६७४६५८ |

## पुणे विभाग

| | |
|---|---|
| धनकवडी | सरस्वती मंगल कार्यालय, पहिला मजला, सर्व्हे नं. २९/१, पुणे-सातारा रोड, धनकवडी, पुणे - ४११ ०४३. फोन : ०२०-३२९०६७४६ |
| हडपसर | अमर समृद्धी कॉम्प्लेक्स, आकाशवाणी केंद्राजवळ, सोलापुर रोड, हडपसर, पुणे - ४११ ०२८. फोन : ०२०-३२५१७६७१ |
| सिंहगड रोड | सर्व्हे नं. १९/१७, आनंद नगर, सोमनाथ दुग्धालया जवळ, सिंहगड रोड, पुणे - ४११ ०५१. फोन : ०२०-३२५३११०२ |
| चंदननगर | बेंद्रे बिल्डींग, पहिला मजला, सर्व्हे नं. ४६/१, संघर्ष चौक, खराडी रोड, चंदननगर, पुणे - ४११ ०१४. फोन : ०२०-३२३११७२२ |

प्रेषक :


पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई

पारिजात भवन, प्लॉट नं. १८, सेक्टर १० ए, नेरुळ(प.),
नवी मुंबई ४०० ७०६. फोन : ३२५९६९९०/२७७०५१२७


बुक - पोस्ट

प्रति ,